राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास व उत्कृष्टता केंद्रांना चालना देण्यासाठी "सी.एम. सृष्टी (CM-SRISTHI - Scheme for Research, Innovations and Technological Hubs in Higher Education Institutions) **योजना राबविण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२६/ई- १४९९३३३/विशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: ७ ऑक्टोबर, २०२६.

<u>प्रस्तावना</u>:-

देशाच्या विकसित होण्यामध्ये आपल्या राज्याचे योगदान असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राज्य शासनाने विकसित महाराष्ट्र @२०४७ हा सर्वसमावेशक आणि धोरणात्मक आराखडा तयार केला आहे. त्याद्वारे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन डॉलर पर्यंत नेण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

विकसित महाराष्ट्र @२०४७ चे व्हिजन डॉक्युमेंट नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शेती, उद्योग, आरोग्य, पर्यटन, शिक्षण, कौशल्य, अर्थ, तंत्रज्ञान इ. १६ घटक आहेत. यातील शिक्षण घटकामध्ये उच्च व तंत्र शिक्षणाचा समावेश आहे.

विकसित महाराष्ट्राचे ध्येय गाठण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचे योगदान महत्वाचे राहणार आहे. त्या अनुषंगाने नवनवीन तंत्रज्ञान विकसित होणे आणि त्याच बरोबर उच्च तंत्रज्ञान अवगत असणारे मनुष्यबळ निर्माण होणे आवश्यक आहे. हेच उद्दिष्ट समोर ठेऊन सी.एम. सृष्टी योजना तयार करण्यात आली.सदर योजनेस मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ ऑक्टोंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली. त्यास अनुसरुन सी.एम. सृष्टी योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यात संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास, उद्योग-संलग्न उच्च शिक्षण, आंतरराष्ट्रीयीकरण, उत्कृष्टता केंद्रे इत्यादी माध्यमातून सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये/संस्था/तंत्रनिकेतने यांमध्ये नवीन संशोधनास चालना/प्रोत्साहन देण्यासाठी "सी.एम. सृष्टी (CM-SRISTHI - Scheme for Research, Innovations and Technological Hubs in Higher Education Institutions)" ही योजना अंमलात आणण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. योजनेची व्याप्ती:-

सी.एम. सृष्टी योजनेअंतर्गत खालील संस्था पात्र राहतील:-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व सार्वजनिक विद्यापीठे.

(२) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई.

(३) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (COEP) तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.

(४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड.

(५) सर्व शासकीय उच्च व तंत्र शिक्षण संस्था.

(६) सर्व शासकीय तंत्रनिकेतने.

३. योजनेच्या लाभासाठी पूर्वअटी:-

१. सहा वर्षांपेक्षा जास्त जुन्या असलेल्या सर्व विद्यमान शासकीय संस्थांसाठी NAAC A+ मुल्यांकन/समकक्ष ही महत्वाची पूर्वअट असेल.
२. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (NIRF) अव्वल २०० मध्ये महाविद्यालयाची क्रमवारी असणे अनिवार्य असेल.
३. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्वायत्त असणे आवश्यक राहील.
४. शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण (Academic and Administrative Audit-AAA) किमान तीन वर्षातून एकदा होणे आवश्यक असेल.
५. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची परिस-स्पर्श योजनेमध्ये महाविद्यालयाचा सहभाग क्रमप्राप्त असेल.
६. महाराष्ट्र शासनाच्या सर्व वैधानिक समितींची (statutory committees) स्थापना झालेली असली पाहिजे.
७. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP) ची अंमलबजावणी सुरु झालेली असणे आवश्यक असेल.
८. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील सर्व कलमे व मार्गदर्शक सूचनांचे पालन होत असले पाहिजे.
९. अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्सचा स्वीकार, अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान प्रणाली (आयकेएस) चा अंतर्भाव, शिक्षकांचे नियमित प्रशिक्षण, निवडक अभ्यासक्रम प्रणालीची (Choice Based Credit System-CBCS) अंमलबजावणी या काही आवश्यक बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

४. योजनेचे घटक:-

४.१. विद्यापीठांमधील उत्कृष्टता केंद्रे (Centers of Excellence- COEs)

अत्याधुनिक व नावीन्यपूर्ण संशोधनासाठी उत्कृष्टता केंद्रे स्थापन करणे अपेक्षित आहे. त्यामध्ये Research in frontier technologies and emerging areas चा समावेश होतो. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अग्रगण्य संस्थांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच शक्यतो उद्योग सहकार्याच्या (Research under mentorship of top national/global institutes, and collaboration with industries) माध्यमातून संशोधन कार्य राबविणे अपेक्षित आहे.

या घटकाचा उद्देश उपयोजित किंवा अनुवादीत संशोधन (Applied or Translational Research) करण्यासाठी आवश्यक क्षमतांचा विकास करणे हा असून, अशा संशोधनातून व्यावसायिक वापरासाठी उच्च क्षमता (High potential for commercial applications) असलेली तंत्रज्ञाने विकसित होण्यास चालना मिळेल. सदर उत्कृष्टता केंद्रे Deep Tech आणि Frontier Technologies क्षेत्रातील संशोधनाकरीता मदत करतील.

उदयोन्मुख संशोधनासाठी प्राधान्य क्षेत्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने दिलेल्या क्षेत्रांचा समावेश आहे. राज्य धोरण, संशोधन आणि नवोन्मेषासाठी उदयोन्मुख क्षेत्रांची सूचक यादी (Indicative list) सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये जोडली आहे.

४.२. विद्यापीठात स्वतंत्र तंत्रज्ञान विभाग स्थापन करणे (Schools of Technology)

सध्या राज्य सार्वजनिक विद्यापीठांमध्ये स्वतंत्र तंत्रज्ञान विभाग अस्तित्वात नाही. विद्यापीठांतर्गत स्वतंत्र तंत्रज्ञान विभाग (The Schools of Technology) उद्योगांच्या गरजेनुसार विविध तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर करण्यावर भर देते. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होईल:-

A. पदव्युत्तर, डॉक्टोरल (Ph.D.) तसेच पोस्ट-डॉक्टोरल संशोधन कार्यक्रमांवर भर देण्यात येईल.

B. विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनुप्रयुक्त संशोधनाकडे (Applied Research) व अनुवादित संशोधनाकडे (Translational research) विशेष कल राहील.

C. नवसंशोधन केंद्रे (Incubation Centers) तसेच संशोधन केंद्रे (Research Parks) यांच्याशी एकात्मता (Integration) साधण्यात येईल.

उद्योगजगताशी भागीदारी करून शैक्षणिक प्रशिक्षण बाजाराच्या गरजांशी सुसंगत करणे, यामध्ये संयुक्त प्रकल्प, औद्योगिक प्रशिक्षण (इंटर्नशिप) आणि उपयोजित (Applied) संशोधनाचा समावेश असतो. राज्य धोरण, संशोधन आणि नवोन्मेषासाठी उदयोन्मुख क्षेत्रांची सूचक यादी (Indicative list) सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये जोडली आहे.

४.३. निवडक शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयांचे रूपांतरण तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये उदयोन्मुख तंत्रज्ञान प्रयोगशाळा उभारणे. (Transformation of government Engineering colleges)

राज्यातील तांत्रिक शिक्षणाचा दर्जा जागतिक स्तरावर नेण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनांचे अत्याधुनिक रूपांतरण (Transformation) करणे आवश्यक आहे. या अंतर्गत पारंपारिक शिक्षण पद्धती बदलून 'इंडस्ट्री ५.०' च्या गरजांशी सुसंगत अभ्यासक्रम लागू करण्यात येतील. राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम महाविद्यालयांइतका उंचावणे. QS World ranking आणि NIRF रँकिंग मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा दर्जा सर्व निकषांनुसार उंचावणे. राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावरील Best Practices चा स्वीकार करणे ही, प्रमुख उद्दिष्टे आहेत.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/संस्था यांच्या रूपांतरणासाठीच्या प्रस्तावाचा सूचक तपशील (Indicative Details) **परिशिष्ट-ब** मध्ये जोडला आहे.

४.४. उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण (Globalisation of Higher Education)

४.४. अ. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आकर्षित करणे. (Attracting International Students)

महाराष्ट्राला जागतिक शिक्षण गंतव्यस्थान बनवण्यासाठी प्रत्येक राज्य सार्वजनिक विद्यापीठात जागतिक ब्रँडिंग आणि ग्लोबल रँकिंग सेल, मिशन संशोधन क्षेत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह आणि सिंगल विंडो सपोर्टसाठी समर्पित आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कार्यालयांसाठी अनुदान दिले जाईल

४.४.ब. आंतरराष्ट्रीय संस्थांना आकर्षित करणे (Attracting International Schools), परदेशी विद्यापीठांच्या शाखा / कॅम्पसचे सह-स्थानिकीकरण (Co-location of Foreign University Campuses)

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांकडे उपलब्ध असलेल्या भौतिक संपत्तीचा प्रभावी उपयोग करून जागतिक दर्जाच्या परदेशी विद्यापीठांच्या शाखा त्यांच्या परिसरात स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. त्याद्वारे दुहेरी पदवी (Dual Degree), संयुक्त पदवी (Joint Degree), संयुक्त संशोधन, प्राध्यापक व विद्यार्थी देवाणघेवाण तसेच संशोधन सुविधा विकसित करण्यास चालना मिळेल. विशेषतः QS World University Rankings मधील अग्रगण्य विद्यापीठे तसेच उदयोन्मुख क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांना आकर्षित करण्यावर भर देण्यात येईल. यासाठी राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांना आवश्यक पायाभूत सुविधा व संशोधन केंद्रांच्या उभारणीसाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल. सदर प्रकल्प हे Viability Gap Funding तत्त्वावर राबविण्यात येतील व त्यामध्ये परदेशी विद्यापीठे अथवा सार्वजनिक-खाजगी

भागीदारी (PPP) यांचे भरीव योगदान अपेक्षित राहील. अशा भागीदारीमुळे अभ्यासक्रम, संशोधन, प्रयोगशाळा, संयुक्त पदवी कार्यक्रम तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांच्या आंतरराष्ट्रीय सहभागाला चालना मिळून राज्यातील उच्च शिक्षण संस्थांची गुणवत्ता, जागतिक स्पर्धात्मकता आणि आंतरराष्ट्रीय मान्यता वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

४.५. मेटा विद्यापीठ (Meta University)

मेटा विद्यापीठ (Meta University) म्हणजे भौतिक कॅम्पसच्या मर्यादांपलीकडे जाऊन, अनेक विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योग, यांना एका सामायिक शैक्षणिक परिसंस्थेत जोडणारी उच्च शिक्षणाची संकल्पना होय. हे विद्यापीठ पारंपरिक एका संस्थेपुरते मर्यादित न राहता, विविध संस्थांमधील अभ्यासक्रम, प्राध्यापक, संशोधन सुविधा व शैक्षणिक संसाधने एकत्रित करून संयुक्त अध्यापन, संशोधन, नवोन्मेष इत्यादी सक्षम करते.

Meta University थोडक्यात वैशिष्ट्ये म्हणजे संसाधनांचे सामायिकरण व कार्यक्षम वापर, लवचिक व वैयक्तिकृत शिक्षण व्यवस्था विकसित करणे, बहुविषयक व आंतरविषयक शिक्षणास चालना देणे, संशोधन व नवोन्मेष परिसंस्था बळकट करणे, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करणे होय.

४.६. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विषयातील उत्कृष्टता केंद्रे

आरोग्य, शिक्षण, शेती, प्रशासन, स्मार्ट शहरे, स्मार्ट मोबिलिटी व पायाभूत सुविधा यांसारख्या सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील आव्हानांना कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI) व मशीन लर्निंग (ML) आधारित उपाययोजनांद्वारे प्रतिसाद देण्यासाठी राज्यातील विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्रे (AI Centres of Excellence) स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. या केंद्रांमार्फत AI, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, रोबोटिक्स, कॉम्प्युटर व्हिजन, नैसर्गिक भाषा प्रक्रिया (NLP), जनरेटिव्ह AI, एजंटिक AI, डिजिटल ट्विन्स, स्पष्टीकरणात्मक व नैतिक AI, मल्टीमोडल लर्निंग तसेच इतर उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये उच्च दर्जाचे संशोधन, नवोन्मेष, कौशल्य विकास, उद्योग-सहकार्य व तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देण्यात येईल. तसेच, उद्योगाभिमुख संशोधन, स्टार्टअप्स, नवोपक्रम आणि AI-ML क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्य वाढवून राज्यातील विद्यापीठांची जागतिक स्पर्धात्मकता आणि महाराष्ट्राचे AI क्षेत्रातील नेतृत्व बळकट करण्यावर भर देण्यात येईल.

४.७. संशोधन निधी (Research Funding)

उच्च शिक्षणाच्या भविष्यातील दृष्टीकोनातून संशोधन निधीचे महत्त्व वाढत असल्याने "ज्ञान-आधारित अर्थव्यवस्था" घडविण्यासाठी राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाला चालना देण्यासाठी स्वतंत्र संशोधन निधीची आवश्यकता आहे. हा निधी मूलभूत, अनुप्रयुक्त

(Applied) तसेच धोरणाधिष्ठित संशोधनाला आर्थिक आधार देऊन शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक नवकल्पना आणि उद्योगाशी संलग्न संशोधन मजबूत करण्याचे कार्य करेल. अशा निधीमुळे विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांना क्षेत्र-अभ्यास, तांत्रिक चाचण्या, प्रोटोटाइप निर्मिती, उपकरणांचा वापर, नाविन्यपूर्ण संकल्पनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, पेटंट अर्ज, धोरणविषयक अभ्यास, यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद उपलब्ध होईल. याबाबत सविस्तर धोरण विभागाकडून तयार करून सुकाणू समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

४.८. संशोधन पार्क (Research Parks)

Research Parks ही संकल्पना उच्च शिक्षण संस्थांच्या परिसराबरोबरच उद्योग, संशोधन संस्था व उद्योजकीय घटक एकत्र आणून वैज्ञानिक आणि तांत्रिक नवकल्पनेचे केंद्र निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. अशा पार्क्समुळे संशोधन प्रक्रिया प्रत्यक्ष हाताळण्यास सक्रीय वातावरण तयार होते. विद्यापीठे आणि महाविद्यालये उत्पादनकेंद्रित संशोधन व उद्योगाला आवश्यक तांत्रिक कौशल्य यांच्यातील दरी भरून काढतात आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तविक समस्यांवर काम करण्याची संधी मिळते. असे संशोधन पार्क स्थापन करताना ती IITs/Institutes of National imporatance येथे सध्या अस्तित्वात असलेल्या संशोधन पार्कच्या धर्तीवर राहील.

उद्योगजगताशी भागीदारी करून शैक्षणिक प्रशिक्षण बाजाराच्या गरजांशी सुसंगत करणे, यामध्ये संयुक्त प्रकल्प, औद्योगिक प्रशिक्षण (इंटर्नशिप) आणि उपयोजित (Applied) व अनुवादित (translational) संशोधनाचा समावेश असतो.

४.९. कॉर्पोरेट सामाजिक दायित्व, माजी विद्यार्थी व उद्योग क्षेत्र निधी (CSR, Alumni and Industry Funding)

उच्च शिक्षणातील संशोधन आणि नवकल्पना यांसाठी शासनाची गुंतवणूक महत्त्वाची असली तरी दीर्घकालीन आर्थिक शाश्वततेसाठी विविध स्त्रोतांमधून निधी उपलब्ध होणेही तितकेच आवश्यक आहे. एखाद्या प्रकल्पासाठी विद्यापीठे किंवा संस्थांना CSR निधी, माजी विद्यार्थ्यांचे (Alumni) योगदान आणि उद्योग क्षेत्राच्या निधीच्या माध्यमातुन निधी मिळणार असल्यास त्या प्रकल्पासाठी कमी पडणारा निधी शासनाकडून देण्यात येईल. शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीची वाटा प्रकल्पानुरूप वेगवेगळा (Flexible) राहील.

योजने अंतर्गत प्रस्तावित प्रकल्पांमध्ये उद्योग क्षेत्राचा सहभाग अनिवार्य राहील. ज्या प्रकल्पांमध्ये उद्योगांचा आर्थिक सहभाग व्यवहार्य असेल अशा प्रकल्पांसाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या किमान २५ टक्के योगदान असणे आवश्यक राहील.

तथापि, पुढील घटकांना उद्योग योगदानाची अट लागू राहणार नाही अथवा शासन आवश्यकतेनुसार शिथिलता प्रदान करू शकेल :

१. विद्यापीठांमधील School of Technology स्थापन करणे.

२. Meta University उपक्रम.

३. शासनाने विशेषतः अधिसूचित केलेले इतर प्रकल्प.

४.१०. विकसित महाराष्ट्र @२०४७ व्हिजन डॉक्युमेंटमध्ये नमूद केलेले उच्च शिक्षणाशी संबंधित उपक्रम सी.एम. सृष्टी योजनेंतर्गत राबविण्यात येतील.

उपरोक्त घटकांच्या पूर्ततेकरिता आवश्यक असतील त्या पायभूत सुविधांचे अद्ययावतीकरण जसे की,नवीन शैक्षणिक इमारती बांधकाम,नूतनीकरण व विस्तार करण्यात येईल. तसेच आवश्यक असलेल्या डिजिटल व शैक्षणिक सुधारणा /अद्ययावतीकरण करण्यात येईल.

५. योजनेच्या अंमलबजावणीची तत्वे:-

सदर योजने अंतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्पांचे आधारभूत तत्वे (Principles) खालीलप्रमाणे असतील.

(१) राष्ट्रीय व जागतिक सर्वोत्तम मानकांशी तुलना (Benchmarking to national and global best standards)

(२) या योजने अंतर्गत देण्यात येणारा निधी हा प्रकल्पाधारित (Project based funding) असेल. त्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करणे आवश्यक राहील.

(३) उद्योग/व्यवसाय सहकार्य अपेक्षित (Industry/business collaboration) आहे.

(४) परदेशी विद्यापीठांसोबत/Institutes of National imporatance सोबत सामंजस्य करार (MoU with foreign universities) आवश्यक राहील.

(५) प्रकल्पाच्या कालावधीसाठी पदांचा आवर्ती खर्च म्हणून काही निधी देण्यात येईल. नंतर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविणे अथवा विद्यापीठाने आर्थिक भार उचलणे अपेक्षित आहे. मात्र अध्यापकीय पदे आवश्यकतेनुसार आकृतीबंधानुसार निर्माण करणे आवश्यक ठरेल.

(६) संशोधनास प्राधान्य देण्यात येईल. (Prioritize research) या योजनेत कमीत कमी बांधकामे राहतील.

(७) राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील अग्रगण्य संस्थांशी सहकार्य व मार्गदर्शन (Collaboration and mentorship with top National/Global institutes)

(८) योजनेकरीता मार्गदर्शक तत्वे (Guidelines) शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात येतील.

६. प्रस्तावांची छाननी व प्रकल्पांची निवड:-

CM-SRISTHI योजनेअंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने व इतर पात्र उच्च शिक्षण संस्थांनी सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report-DPR) सुकाणू समितीअंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या प्रकल्प अंमलबजावणी कक्षास (Project Implementation Unit-PIU) सादर करणे

आवश्यक राहील. प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे दैनंदिन कामकाज राज्य प्रकल्प संचालक, रूसा यांच्यामार्फत पाहिले जाईल.

सादर करण्यात येणाऱ्या DPR मध्ये प्रकल्पाची आवश्यकता, उद्दिष्टे, निधीचा विनियोग, अपेक्षित निष्पन्न (Outcomes) व प्रकल्पाची शाश्वतता स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील. संशोधन परिसंस्था बळकट करण्याच्या उद्देशाने सदर DPR ची तपासणी संबंधित संशोधन क्षेत्रातील राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांकडून (Institutes of National Importance) करण्यात येईल.

प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडून प्राप्त DPR ची प्राथमिक छाननी करून ते सुकाणू समितीकडे अंतिम मूल्यांकनासाठी सादर करण्यात येतील. या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सुकाणू समिती

सुकाणू समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	नाव	पदनाम
१.	अ.मु.स/प्र.स./सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२.	अ.मु.स/प्र.स./सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी	सदस्य
३.	अ.मु.स/प्र.स./सचिव, नियोजन विभाग यांचे प्रतिनिधी	सदस्य
४.	महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेचे (MahaSARC) अध्यक्ष	सदस्य
५.	शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण/ उद्योग-शैक्षणिक भागीदारी तज्ज्ञ	सदस्य
६.	संचालक/प्रतिनिधीः- (आवश्यकतेनुसार) १. आय.आय.टी. मुंबई २. आय.आय.एम. नागपूर/मुंबई. ३. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन क्षेत्रातील नामांकित संस्था ४. आय.आय.एस.ई.आर. (IISER - Indian Institute of Science Education and Research), पुणे ५.टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR), मुंबई, ६. रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई ७. संबंधित विषयातील/ उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ.	विशेष आमंत्रित सदस्य
७.	कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड	विशेष आमंत्रित सदस्य
८.	संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
९.	संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
१०.	राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा), मुंबई	सदस्य सचिव

उपरोक्त सुकाणू समितीने शिफारस केलेल्या प्रकल्पांना विद्यमान आर्थिक निकषांनुसार आणि प्रचलित धोरणानुसार शासनाकडून मान्यता देण्यात येईल.

७. योजनेचा कालावधी:-

सदर योजनेचा कालावधी ५ वर्षांचा म्हणजेच आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०३०-३१ असा राहील. त्यानंतर सविस्तर आढावा घेऊन योजनेत आवश्यक ते बदल करण्यात येतील.

८. योजनेच्या निधीबाबत:-

१) सदर योजनेच्या अमंलबजावणीसाठी नव्याने लेखाशीर्ष घेऊन सदर लेखाशीर्षाअंतर्गत निधीची आवश्यक तरतूद करण्यात येईल.

२) सी.एम. सृष्टी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व देखरेखीसाठी संबंधित कामांच्या मंजूर अनुदानाच्या २ टक्के इतका निधी प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Project Implementation Unit-PIU), आवश्यक मनुष्यबळ, संस्थात्मक संरचना, मॉनिटरिंग पोर्टल तसेच इतर प्रशासकीय खर्चासाठी वापरण्यात येईल.

३) योजनेअंतर्गत मंजूर अनुदानाचा उपयोग केवळ योजनेच्या घटकांच्या अंमलबजावणीसाठी करण्यात येईल. सदर निधीचा वापर अन्य बांधकामे, वाहन खरेदी तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन किंवा निवृत्तीवेतन यासाठी करण्यात येणार नाही.

४) विकसित महाराष्ट्र २०४७ मधील उद्योग-शैक्षणिक सहकार्याच्या उद्दिष्टांशी सुसंगत असणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच, प्रकल्पांना निधीच्या उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००७१५०१२२०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENUGOPAL REDDY BOLLAVARAM

Digitally signed by VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=97575b20152cd7d6140b21e873943cf8e0b594f98f7d940a604a875057f9a5c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ADC518D1EC700B3AD7386666A2EAA0C03E0791D886CF553BBCC7819653DDCF29, cn=VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
Date: 2026.10.07 15:19:14 +05'30'

(बी.वेणुगोपाल रेड्डी)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. उपमुख्यमंत्री (राऊशु) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा), मुंबई,
१२) सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६) कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१७) कुलसचिव, सर्व (राज्य) अभिमत विद्यापीठे,
१८) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,
१९) कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक जि. नागपूर,
२०) कुलसचिव, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजीकल विद्यापीठ, नागपुर
२१) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड.
२२) कुलसचिव, कॉलेज ऑफ इंजिनियरींग तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे
२३) कुलसचिव, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई
२४) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२५) निवडनस्ती (विशि-३)

परिशिष्ट-अ

राज्य धोरण, संशोधन आणि नवोन्मेषासाठी उदयोन्मुख क्षेत्रांची सूचक यादी (Indicative list)

अ. शाश्वत विकास, समुदाय सहभाग आणि हवामान बदल अभ्यासासाठी विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology for Sustainable development, Community Outreach and Climate Change Studies)

१. हवामान बदलाची आव्हाने- पृथ्वी, पर्यावरण आणि पिकांवरील परिणाम (Climate Change Challenges- Impact on Earth, Environment and Crops)
२. उजाड/निकृष्ट झालेल्या जमीन, पाणी व हवा सुधारण्यासाठी हरित तंत्रज्ञान (Green Technologies for the Restoration of Degraded/ Barren Land, Water, and Air)
   - नॅनोझाइम्स (Nanozymes)
   - हरित नायट्रोजन स्थिरीकरण (Green Nitrogen Fixation)
३. जैवविविधता अभ्यास आणि संवर्धन (Biodiversity Studies and Conservation)
४. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन आणि प्रदूषण कमी करणे (Wastewater and Solid Waste Management and Pollution Reduction)
५. भारत सरकारच्या - “पंचामृत” कृती आराखड्याशी सुसंगती (Alignment with the Government of India's 'Panchamrit' Action Plan)

ब. ऊर्जा सुरक्षितता आणि शाश्वत विकासासाठी नवीन तंत्रज्ञान (Novel Energy Security and Technologies for Sustainable Development)

१. ऑस्मोटिक ऊर्जा प्रणाली (Osmotic Power Systems)
२. हरित हायड्रोजन निर्मिती, साठवणूक व इंधन पायाभूत सुविधा (Green Hydrogen Production, Storage, and Fuel Infrastructure)
३. कार्बन डायऑक्साइडपासून मेथेनॉल/इथेनॉल निर्मिती (Production of Methanol/ Ethanol from Carbon Dioxide)
४. इंधन पेशी (Fuel Cell) तंत्रज्ञान) Fuel Cell Technology
५. ऊर्जा निर्मितीसाठी हरित अमोनिया व सुपर कॅपॅसिटर (Green Ammonia and Supercapacitors for Energy Generation)
६. अक्षय ऊर्जा स्रोत (Renewable Energy)

क. नवीन तंत्रज्ञान, रचना व नवोन्मे New Technology, Design and Innovation)

१. डेटा विज्ञान आणि विश्लेषण (Data Science & Analytics)
   a. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व यंत्र शिक्षण (Machine Learning)
   b. डिजिटल पायाभूत सुविधा व डेटा केंद्रे
२. औद्योगिक इंटरनेट ऑफ थिंग्ज (IIoT): सहकार्यात्मक संवेदन तंत्र (Collaborative Sensing)
३. उत्पादन रचना व स्मार्ट उपकरणे (Product Design and Smart Devices)

४. रिव्हर्स इंजिनिअरिंग व 3D मॉडेलिंग:प्रगत उत्पादन तंत्रज्ञान व डिजिटल ट्विन प्रणाली (Reverse Engineering and 3D Modeling: Advanced Manufacturing Technology and Digital Twin Systems)

५. ड्रोन, प्रगत रोबोटिक्स आणि प्रक्रिया स्वयंचलन (Drones, Advanced Robotics, and Process Automation)

६. सायबर सुरक्षा
   - सायबर संरक्षण प्रणाली (संरक्षण व अवकाश क्षेत्र)
   - जनरेटिव्ह वॉटरमार्किंग (Generative Watermarking)

७. क्वांटम तंत्रज्ञान: क्वांटम संप्रेषण व संवेदन, क्वांटम क्रिप्टोग्राफी (Quantum Technology: Quantum Communication and Sensing, Quantum Cryptography)

८. ऑगमेंटेड रिॲलिटी व व्हर्च्युअल रिॲलिटी (Augmented Reality and Virtual Reality (AR and VR))

९. ५G/६G संप्रेषण, प्रगत प्रकाशीय व रेडिओ संप्रेषण, समुद्राखालील वायरलेस संप्रेषण (५G/६G Communication, Advanced Optical and Radio Communication, Underwater Wireless Communication)

१०.अवकाश विज्ञान व अभियांत्रिकी: गुरुत्वाकर्षण सेन्सर, लघु उपग्रह, अवकाश आधारित पृथ्वी निरीक्षण व हवामान निरीक्षण (Space Science and Engineering: Gravity Sensors, Small Satellites, Space- based Earth Observation and Weather Observation)

११.प्रगत अणु विज्ञान व तंत्रज्ञान (SMRs, Gen-IV, Fusion)
कृषीतील किरणोत्सर्ग तंत्रज्ञान (Radiation Technology in Agriculture)
अणु वैद्यक आणि किरणोपचार (Nuclear Medicine and Radiotherapy)

१२.संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान:- इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली, निर्देशित ऊर्जा तंत्रज्ञान, स्वायत्त पाणबुडी वाहने, उपग्रह नेव्हिगेशन, हायपरसॉनिक शोध व ट्रॅकिंग प्रणाली,

१३.सागरी व महासागरीय अभ्यास:- सखल समुद्र अभियांत्रिकी, महासागर मॉडेलिंग, निळी अर्थव्यवस्था (Blue Economy)

ड. नवीन व प्रगत साहित्य (New and Advanced Materials)

१. नॅनोतंत्रज्ञान व प्रगत संमिश्र साहित्य (Nanotechnology and Advanced Composite Materials)

२. दुर्मिळ धातू व महत्त्वाच्या खनिजांचे उत्खनन व प्रक्रिया (Mining and Processing of Rare Earth Elements and Critical Minerals)

३. ऊर्जा संकलन व साठवणुकीसाठी नवीन साहित्य: सुपर कॅपॅसिटर व बॅटरी तंत्रज्ञान, जैव-उपचार साहित्य (Bio-Therapeutics), स्ट्रक्चरल बॅटरी कॉम्पोझिट्स (), ईव्ही बॅटरी प्रणाली व पॉवर इलेक्ट्रॉनिक्स

४. अर्धसंवाहक (Semiconductor) विज्ञान व तंत्रज्ञान:- वाइड व अल्ट्रा-वाइड बॅंडगॅप अर्धसंवाहक, ULSI रचना व निर्मिती, चिप उत्पादन व ATMP प्रक्रिया, स्वायत्त जैवरासायनिक संवेदन (Autonomous Biochemical Sensing), अवकाश व संरक्षण दर्जाचे अर्धसंवाहक

५. अत्यंत शुद्ध व विशेष रसायने आणि वायू (Semiconductor, EV इत्यादींसाठी)

इ. मानवी आरोग्य व कल्याण (Human Health and Well-being)

१. व्यक्ती व समुदायांसाठी आरोग्य निर्देशांक, वैयक्तिक औषधोपचार (Health Indices for Individuals and Communities)
२. जेरियाट्रिक (वृद्ध) संशोधन:-न्यूरोडिजेनेरेटिव्ह आजारांसाठी GLP-१ औषधे
३. आण्विक वैद्यक (Molecular Medicine):-जैव-अभियांत्रिकी आधारित जिवंत उपचार प्रणाली (Engineered Living Therapeutics)
४. अन्न सुरक्षा व सुरक्षितता (Food Security and Safety)
५. जिनोमिक्स, जीन थेरेपी व अनुवांशिक अभियांत्रिकी (Genomics, Gene Therapy, and Genetic Engineering)

ई. संस्कृती, विकास व लोकशाही (Culture, Development and Democracy)

१. संज्ञान विज्ञान व जटिल प्रणाली (Cognitive Science and Complex System)
२. लोकशाही व विकास (Democracy and Development)
३. सुशासन व सार्वजनिक धोरण (Good Governance and Public Policy)
४. सामाजिक चळवळी व सामूहिक कृती (Social Movements and Collective Action)
५. शहरी अभ्यास (Urban Studies)
६. तुलनात्मक साहित्य व भाषाविज्ञान (Comparative Literature and Linguistics)
७. डिजिटल मानवशास्त्र (Digital Anthropology)
८. सामाजिक न्याय, समावेशकता व समता (Social Justice, Inclusivity and Equality)
९. प्रादेशिक राजकीय अर्थव्यवस्था (Regional Political Economy)
१०. आंतरराष्ट्रीय संबंध व भू-राजनीती (International Relations and Geopolitics)
११. निवडणूक सुधारणा (Electoral Reforms)
१२. क्रीडा विज्ञान व तंत्रज्ञान, पारंपरिक खेळ (Sports Science and Technology, Traditional Games)
१३. भारतीय ज्ञान प्रणाली (Indian Knowledge Systems)

उ. व्यवसाय व सेवा क्षेत्र (Business and Service Sector)

१. फिनटेक, लॉजिस्टिक्स, व्यापार व वाणिज्य
२. रोजगारक्षमता वृद्धीः AI, EV, अर्धसंवाहक, अवकाश व संरक्षण उत्पादन क्षेत्रातील भावी कौशल्ये
३. सांस्कृतिक बुद्धिमत्ता व कौशल्य मूल्यांकन (Cultural Intelligence and Skill Assessment)
४. व्यवसाय बुद्धिमत्ताः कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित निर्णय प्रणाली (Business Intelligence: Artificial Intelligence-Based Decision Systems)
५. डिझाईन थिंकिंग

सर्जनशील डिझाईन व माध्यम क्षेत्र (Creative Design and Media Sector)

VENUGOPAL REDDY BOLLAVARAM

Digitally signed by VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=97575b20152cd7d6140b21e873943cf8e0b594f98f7d940a604a875057f9a5c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ADC518D1EC700B3AD7386666A2EAA0C03E0791D886CF553BBCC7819653DDCF29, cn=VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
Date: 2026.10.07 15:19:47 +05'30'

(बी.वेणुगोपाल रेड्डी)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट-ब

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/संस्था यांच्या रूपांतरणासाठीच्या प्रस्तावाचा सूचक तपशील

(Indicative Details)

उत्कृष्टता केंद्रांचे क्षेत्र	माहिती	सहभागी संस्था
अभियांत्रिकी, प्रोटोटायपिंग आणि नाविन्यपूर्ण उत्प्रेरक केंद्रांची स्थापना	**१. रसायन तंत्रज्ञान संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी), मुंबई:** रासायनिक अभियांत्रिकी व तंत्रज्ञान केंद्र, प्रगत पदार्थ संशोधन केंद्र, कंपोझिट व अभिनव उत्पादन केंद्र (CAMCIM), जैवतंत्रज्ञान व जैवविज्ञान केंद्र, फार्मसी केंद्र या क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. प्रस्तावित Centre for Advanced Material Research, Composite and Innovative Manufacturing (CAMCIM) स्थापन करण्यामागील उद्देश महाराष्ट्र राज्यातील प्रगत साहित्य (Advanced Materials), संमिश्र पदार्थ (Composites) आणि अभिनव उत्पादन तंत्रज्ञान (Innovative Manufacturing) क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाचे संशोधन, चाचणी सुविधा, कौशल्य विकास व उद्योग-संलग्न नवोपक्रम परिसंस्था निर्माण करणे हा आहे. नॅनोमटेरियल्स, कार्बन-कार्बन कॉम्पोझिट्स, संरक्षण व एरोस्पेस क्षेत्रासाठी हलकी धातू, पॉलिमर व प्लास्टिक साहित्य तसेच अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये संशोधन व विकासाला चालना देत उद्योग, शैक्षणिक संस्था आणि संशोधन संस्थांमधील सहकार्य बळकट करण्याचे उद्दिष्ट आहे. सदर केंद्राच्या माध्यमातून जागतिक दर्जाच्या चाचणी सुविधा उपलब्ध होऊन संशोधनाधारित नवोपक्रम, तंत्रज्ञान हस्तांतरण, उद्योग प्रायोजित प्रकल्प, कौशल्य विकास व मनुष्यबळ निर्मितीला प्रोत्साहन मिळेल **२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे:** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्वांटम संशोधन, रोबोटिक्स व स्वयंचलन (Automation) या क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदर प्रस्तावात डिजिटल कॅम्पस, उद्योग-सहभाग, कौशल्य विकास, संशोधन व नवोपक्रम परिसंस्था, स्टार्टअप इन्क्युबेशन तसेच अध्यापक क्षमता विकास यांवर भर देण्यात आला असून, विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता व उद्योगसज्जता वाढणे, संशोधन प्रकाशने, पेटंट्स व स्टार्टअप्समध्ये वाढ होणे, राष्ट्रीय मानांकन व क्रमवारीत सुधारणा होणे, उद्योग-शैक्षणिक सहकार्य बळकट होणे तसेच कोकण व महाराष्ट्राच्या प्रादेशिक तंत्रज्ञान व औद्योगिक विकासास चालना मिळणे अपेक्षित आहे. **३. COEP तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे:** COEP तंत्रज्ञान विद्यापीठाने सी) सृष्टी योजनेअंतर्गत .एम.CM SRISTHI) विद्युत गतिशीलता, बॅटरी व्यवस्थापन प्रणाली, नदी प्रदूषण व्यवस्थापन, डिजिटल	डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई, सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ, पुणे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, छ. सभाजीनगर, जळगाव आणि कराड, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, मुंबई, श्री गुरुगोविंदसिंहजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड.

उत्कृष्टता केंद्रांचे क्षेत्र	माहिती	सहभागी संस्था
	शेती, शाश्वत उत्पादन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, ड्रोन तंत्रज्ञान, प्रगत पदार्थ विज्ञान, हवामान संशोधन व भविष्यकालीन उत्पादन प्रणाली या क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता केंद्रे (CoEs) स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या प्रकल्पाद्वारे संशोधन, नवोपक्रम, उद्योग सहकार्य, रोजगारक्षमता, स्टार्टअप परिसंस्था आणि उद्योग ४.० आधारित कौशल्य विकासाला चालना मिळून संस्थेचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व अधिक बळकट होणे अपेक्षित आहे. **४. श्री गुरुगोविंदसिंहजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड:** सदर संस्थेने कृत्रिम बुद्धिमत्ता व अनुप्रयोग, मटेरियल कॅरेक्टरायझेशन आणि नॅनोतंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये ३ उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या केंद्रांमुळे जागतिक दर्जाच्या संशोधन व चाचणी सुविधा निर्माण होऊन संशोधन प्रकाशने, पेटंट्स, उद्योग-सल्लागार सेवा, स्टार्टअप्स तसेच मराठवाडा विभागातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. **५. वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI), मुंबई:** सदर संस्थेने कृत्रिम बुद्धिमत्ता, 3D प्रिंटिंग व जैववैद्यकीय उत्पादन, ट्रायबोलॉजी व इलेक्ट्रोमेकॅनिकल प्रणाली, ड्रोन व संरक्षण तंत्रज्ञान तसेच मूल्यवर्धित वस्त्रोद्योग या क्षेत्रांमध्ये ५ उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या उपक्रमामुळे संशोधन, पेटंट्स, स्टार्टअप्स, उद्योग सहकार्य, तंत्रज्ञानाधारित उत्पादने आणि विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत लक्षणीय वाढ होऊन संस्था राष्ट्रीय नवोपक्रम केंद्र म्हणून विकसित होण्यास मदत होईल. **६. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर:** सदर संस्थेने स्मार्ट, सुरक्षित व शाश्वत तंत्रज्ञान (CS^3T) या विषयावरील उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. औद्योगिक IoT, सायबर सुरक्षा, डिजिटल ट्विन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, मेडटेक व स्मार्ट सिटी तंत्रज्ञानावर आधारित हे केंद्र उद्योग ४.० परिसंस्था विकसित करण्यास, संशोधन, पेटंट्स, स्टार्टअप्स आणि रोजगार निर्मितीस चालना देण्यास महत्त्वपूर्ण ठरेल. **७. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव:** सदर संस्थेने कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग, रोबोटिक्स व प्रगत सिम्युलेशन तसेच ई-वाहन व उदयोन्मुख तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये ३ उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या प्रकल्पामुळे स्मार्ट कॅम्पस, नवोपक्रम केंद्र, उद्योग-सहभाग, संशोधन क्षमता,	

उत्कृष्टता केंद्रांचे क्षेत्र	माहिती	सहभागी संस्था
	स्टार्टअप्स आणि विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढून उत्तर महाराष्ट्रातील प्रादेशिक नवोपक्रम केंद्र म्हणून संस्थेची ओळख निर्माण होईल. **८. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड:** सदर संस्थेने कृत्रिम बुद्धिमत्ता, AIoT, विद्युत वाहन तंत्रज्ञान, AR/VR, संगणकीय दृष्टी (Computer Vision), SAP/HANA, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि सेमीकंडक्टर-VLSI या क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या प्रकल्पामुळे उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन, स्टार्टअप्स, डिजिटल कॅम्पस, उद्योग सहकार्य आणि विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण व रोजगार संधींमध्ये वाढ होऊन संस्था भविष्याभिमुख तांत्रिक शिक्षण केंद्र म्हणून विकसित होईल. **९. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती:** सदर संस्थेने कृत्रिम बुद्धिमत्ता व जनरेटिव्ह AI, रोबोटिक्स व इंडस्ट्री ४.०, सेमीकंडक्टर व VLSI, शाश्वत ऊर्जा व विद्युत गतिशीलता तसेच स्मार्ट पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये ५ उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या प्रकल्पाद्वारे अत्याधुनिक संशोधन सुविधा, उद्योग सहकार्य, स्टार्टअप्स, पेटंट्स, संशोधन निधी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील कौशल्य विकास साध्य करून विदर्भातील अग्रगण्य तांत्रिक नवोपक्रम केंद्र म्हणून संस्थेचा विकास अपेक्षित आहे.	

VENUGOPAL REDDY BOLLAVARAM

Digitally signed by VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=97575b20152cd7d6140b21e873943cf8e0b594f98f7d940a604a875057f9a5c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ADC518D1EC700B3AD7386666A2EAA0C03E0791D886CF553BBCC7819653DDCF29, cn=VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
Date: 2026.10.07 15:20:01 +05'30'

(बी.वेणुगोपाल रेड्डी)

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन